## थोडक्यात

### कोरोना : पनवेल तहसील कार्यालयातील सुनावण्या रद्द

। रायगड टाइम्स ।

पनवेल । तहसीलदार पनवेल यांच्या न्यायालयातील होणाऱ्या सुनावण्या रद्द करण्यात आल्या आहेत. या सुनावण्या पुढील तारखेस मे महिन्यात होणार असल्याची माहिती तहसीलदार विजय तळेकर यांनी दिली. कोरोना या संसर्गजन्य विषाणूंचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी दक्षता घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. यासाठी विविध स्वरूपाच्या उपाययोजना सुरू असून त्याचाच एक भाग म्हणून शासकीय कार्यालयातील गर्दी कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी आलेल्या अभ्यंगतांच्या व्यतिरिक्त अन्य अभ्यागतांना शासकीय कार्यालयात परवानगी असणार नाही असे निर्देश देण्यात आले आहेत. तहसीलदार पनवेल यांच्या न्यायालयातील सुनावण्या रद्द करण्यात आल्या आहेत. या सर्व सुनावण्या मे महिन्यात होणार आहेत.

### पनवेल : रिक्षाच्या धडकेत महिला जखमी

। रायगड टाइम्स ।

पनवेल । रिक्षा वेगाने चालवून पायी चालत जाणाऱ्या ५५ वर्षीय महिलेला धडक दिल्याने या धडकेत महिला जखमी झाली आहे. कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कामोठे, सेक्टर १२ येथील नंदा पूकळे ह्या शंकर मंदिर, कामोठे गाव येथून दर्शन घेऊन पायी चालत जात होत्या. यावेळी रिक्षा क्रमांक एम एच ४६ एसी २६४० वरील चालकाने भरधाव वेगाने येऊन त्यांना धडक दिली. या धडकेत नंदा या जखमी झाल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. रिक्षाचालक विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नोकरीचे आमिष दाखवून केली फसवणूक

। रायगड टाइम्स ।

पनवेल । बँकेत नोकरी लावण्याचे अमिष दाखवून एक लाख सत्तर हजार उकळल्याचा प्रकार खारघर येथे घडला असून याबाबत खारघर पोलिस सदर आरोपीचा शोध घेत आहेत. तक्रारदार कालीदास पवार यांची ४ वर्षांपूर्वी ओळख गोरखनाथ कराड यांच्यासोबत झाली. त्यांनी पवार यांना तुमच्या नातेवाईकांना देना बँकेमध्ये नोकरी लावतो यासाठी साहेबांना पैसे द्यावे लागतील असे सांगून वेळोवेळी वेगवेगळी कारणे देत २० हजार, ४० हजार असे एकूण १ लाख १० हजार रूपये उकळले. त्याचप्रमाणे त्यांच्या ओळखीतील चव्हाण या व्यक्तीकडूनही ६० हजार रूपये घेतले होते. एवढी रक्कम देऊनही नोकरी लावण्यास कराडे यांनी टाळाटाळ केल्याने त्याच्याविरोधात पवार यांनी खारघर पोलिस ठाण्यात फसवणूकीची तक्रार दाखल केली आहे.

### पनवेल : बीएमडब्ल्यू गाडीला लागली आग

। रायगड टाइम्स ।

पनवेल । एका भरधाव वेगाने जाणाऱ्या बीएमडब्लू गाडीला अचानकपणे लागलेल्या आगीत गाडी पूर्णपणे जळून खाक झाली असून सुदैवाने गाडीतील तीनही प्रवाशांना कोणतीही दुखापत झाली नाही. पनवेल बाजूकडून पुणे बाजूकडे एक्सप्रेस मार्गावरून जाणाऱ्या बीएमडब्लू गाडीला अचानकपणे अचानकपणे आग लागली. यावेळी गाडीतून तीन जण प्रवास करीत होते. आगीचे गांभीर्य ओळखून सदर प्रवासी पटकन गाडीतून बाहेर पडले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी आले व त्यांनी आग विझवली आहे. सदर आग हि शॉर्टसर्कीटने लागली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. यात गाडी पूर्ण जळून खाक झाली आहे. यांनी खारघर पोलिस ठाण्यात फसवणूकीची तक्रार दाखल केली आहे.

### सहाय्यक पोलीस निरीक्षक राजीव कदम यांचे निधन

। रायगड टाइम्स ।

पनवेल । पोलिस खात्यातील राजा माणूस असलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक राजीव कदम यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांचे अंत्यसंस्कार त्यांच्या मूळ गावी करण्यात आले. पनवेल शहर पोलिस ठाणे, पनवेल तालुका पोलिस ठाणे, नवी मुंबईतील विविध पोलिस ठाण्यांमध्ये काम केलेले व सध्या आर, बी, आय, सुरक्षा येथे नेमणूक असलेले राजीव कदम यांचे वयाच्या ५६ व्या वर्षी रूग्णालयात उपचार घेत असताना दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# श्रीवर्धनमधील ६ गावे झाली वीजबिल थकबाकी मुक्त

## चक्रीवादळग्रस्त श्रीवर्धनकरांनी राज्यासमोर ठेवला आदर्श

। रायगड टाइम्स ।

**अलिबाग । निसर्ग चक्रीवादळाचा जोरदार तडाखा बसलेल्या रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यात महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत, श्रीवर्धन तालुक्याचा विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी श्रीवर्धन तालुकातील वीज ग्राहकांचा सिंहाचा वाटा आहे आणि अजून एक आदर्श या तालुक्याने आपल्या महाराष्ट्र समोर आणला आहे ते म्हणजे १०० टक्के वीजबिल थकबाकी मुक्त गावे ही मोहीम यशस्वी करून दाखवली आहेत. श्रीवर्धन तालुक्यातील तब्बल सहा गावे वीजबिल थकबाकी मुक्त झाली आहेत.**



वाढलेल्या वीजबिल थकबाकीमुळे संकटात आलेल्या महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयातून दिलेल्या सूचना व उत्तम मार्गदर्शनामुळे संकटात आलेली महावितरण कंपनी वीज ग्राहकांच्या उत्तम प्रतिसादामुळे पूर्वपदावर येत आहे. श्रीवर्धन शहर व तालुक्यातील वीज ग्राहकांनी थकित वीज बिल भरण्यासाठी चांगले सहकार्य केले आणि महाराष्ट्रासमोर तालुक्यातील भोस्ते, वडघर, पांगळोली, सतीचीवाडी, बापवन व गालसुरेकाठी ही गावे वीज बिल थकबाकी मुक्त होऊन नवा आदर्श निर्माण केला आहे.

विशेष बाब म्हणजे घरगुती, वाणिज्य, औद्योगिक श्रेणीतील थकबाकीमुक्ती मध्ये श्रीवर्धन तालुक्यातील या सहा गावांचा समावेश आहे. जानेवारी २०२१ ची थकीत रक्कम वडघर येथील १४२ ग्राहकांनी एकूण ५९ हजार ६८१ रुपये, भोस्ते येथील २८७ ग्राहकांनी १ लाख ९८ हजार ७२६ रुपये, पांगळोली येथील ७३ ग्राहकांनी २९ हजार ५२८ रुपये सतीचीवाडी येथील ६७ ग्राहकांनी २२ हजार ३८९ रुपये, गालसुरेकाठी येथील ५५ ग्राहकांनी ९८ हजार २९३ रुपये व बापवन येथील १३० ग्राहकांनी ४८ हजार ३७३ रुपये अशी एकूण ४ लाख ५६ हजार ९८९ रुपये पूर्णपणे थकबाकी भरुन ही सहा गावे वीजबिल थकबाकी मुक्त झाली आहेत.

भांडुप परिमंडळाचे मुख्य अभियंता सुरेश गणेशकर यांच्या व पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गोरेगाव विभागाचे कार्यकारी अभियंता आप्पासाहेब खांडेकर, गोरेगाव विभागाचे उपव्यवस्थापक निशिकांत धाईंजे यांनी विशेष मेहनत घेतली. श्रीवर्धन उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता महेंद्र वाकपैंजण, सहाय्यक अभियंता दिनेश गंगावणे, प्रधान तंत्रज्ञ विजय करंबत, वरिष्ठ तंत्रज्ञ ज्ञानेश्वर इंगोले, वरिष्ठ तंत्रज्ञ श्रीमती अर्चना कोमनाक यांनी या वीजबिल वसुली मोहिमेत विशेष सहकार्य केले.

वीजबिल थकबाकीमुक्त झाल्यामुळे भांडुप परिमंडळातर्फे या सर्व ग्राहकांचे अभिनंदन करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील उर्वरित गावाच्या ग्राहकांनीसुद्धा आपले थकीत वीजबिल तसेच ग्रामपंचायतींनी त्यांच्या पथदिव्यांची थकबाकी भरून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# पेण : व्यापाऱ्यांना सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत दुकाने उघडण्याची परवानगी द्यावी

## पेण शहर काँग्रेसची मागणी; पालिका मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



। रायगड टाइम्स ।

पेण । कोरोनाचा प्रसार रोखण्याकरिता शासनाने ब्रेक दि चेन अंतर्गत घातलेल्या निर्बंधांतून पेण तालुक्यातील व्यापाऱ्यांना थोडी शिथिलता देण्यात यावी. सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत दुकाने उघडण्याची परवानगी द्यावी. ज्यायोगे नागरिकांनाही सोय उपलब्ध होईल व व्यापाऱ्यांवरही उपासमारीची पाळी येणार नाही, अशा मागणीचे निवेदन काँग्रेस पेण शहर अध्यक्ष प्रवीण शंकर पाटील यांच्यासह एक हिंदुस्तानी इन्सान संस्थेचे अध्यक्ष व सराफ असोसिएशनचे माजी सचिव अशोक जैन यांनी तहसीलदार डॉ.अरुणा जाधव व पेण नगरपालिकेच्या मुख्याधिकारी अर्चना दिवे यांना दिले.

मागील वर्षी केंद्र सरकारने घातलेल्या निर्बंधांमुळे अनेक महिने व्यापाऱ्यांची दुकाने बंद होती. त्यामुळे आधीच व्यापारी आर्थिक अडचणीत आहेत. अनेक व्यापाऱ्यांची भाड्याची दुकाने आहेत. दुकाने बंद असतानाही दुकानाचे भाडे, लाईट बिल, कामगारांचा पगार तसेच बँकांमधून घेतलेल्या कर्जाचे हप्ते इत्यादी खर्च व्यापाऱ्यांना करायलाच लागतो. दुकाने बंद असल्यामुळे उत्पन्नाचे साधन पूर्णतः बंद होते. त्यामुळे व्यापाऱ्यांवर आर्थिक बोजा अधिकच वाढत चालला आहे. व्यापाऱ्यांच्या या समस्यांची प्रशासनाने दखल घ्यावी व त्यांच्या अर्जावर सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी काँग्रेस पेण शहर अध्यक्ष प्रवीण शंकर पाटील यांनी केली. या काळात व्यापाऱ्यांकडून शासनाने दिलेल्या कोरोना नियमांचे पूर्णता पालन करण्यात येईल असे आश्वासन अशोक जैन यांनी दिले.

यावेळी मुख्याधिकारी अर्चना दिवे यांनी सांगितले की, व्यापाऱ्यांनी केलेल्या मागणीसंदर्भात जिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शन घेऊन त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कारवाई करण्यात येईल अशी प्रतिक्रिया दिली.

# खांदा कॉलनीत महाविकास आघाडीचा केला तीव्र निषेध




। रायगड टाइम्स ।

पनवेल । कोरोनावर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्य सरकारने निर्बंध जाहीर केले आणि प्रत्यक्षात मात्र 'ब्रेक दि चेन'च्या नावाखाली संपूर्ण लॉकडाऊन लागू करण्याचा घाट महाविकास आघाडी सरकारने घातला असल्याने तसेच वीकेण्डला कडक लॉकडाऊन असताना त्याआधीच दुकानांचे शटर खाली करायला लावल्याने व्यापाऱ्यांसह नागरिकांमध्ये कमालीची नाराजी पसरली आहे.

त्या अनुषंगाने गुरुवारी (८ फेब्रुवारी) खांदा कॉलनी येथील व्यापाऱ्यांनी आंदोलन करीत ठाकरे सरकारचा निषेध केला. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी या आंदोलनात व्यापारी, दुकानदार, छोटे व्यावसायिक, व जनतेचे हाल करू नका, असे राज्य शासनाला आवाहन करतानाच राज्य सरकारने जनतेचे, छोट्या व्यापारी, दुकानदारांचे हाल थांबावेत, जे काही कडक निर्बंध लावले आहेत ते मागे घ्यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी राज्य सरकारला दिला. यावेळी नगरसेवक एकनाथ गायकवाड, नगरसेविका सीता पाटील, युवा नेते अभिषेक भोपी, यांच्यासह व्यापारी असोसिएशन, नाभिक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

या आंदोलनात 'लॉकडाऊन हटाओ, व्यापारी बचाओ' असे फलक हातात घेऊन व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त केला. तर पनवेल तालुका नाभिक समाज मंडळाने 'आम्हाला भीक मागायला लावू नका', 'आम्ही उपाशी मरायचे का? अशा आशयाचे बॅनर झळकवून राज्य सरकारचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला.

लॉकडाऊनविरोधात नवीन पनवेल, खारघर आणि कळंबोलीतील व्यापाऱ्यांनीही मंगळवारी आंदोलन केले होते. अशा पद्धतीने लॉकडाऊन लावणे योग्य नसल्याचे व्यापारी वर्गाचे म्हणणे आहे. एक महिना दुकाने व व्यवसाय बंद राहणार असल्याने मोठ्या आर्थिक नुकसानीला दुकानदार, व्यापारी, व्यावसायिकांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे दिसून येत आहे. अचानक दुकाने बंद केल्याने तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे.

दुकानाचे भाडे, नोकरांचा पगार, कर्जांचे हप्ते या सर्व समस्यांना सामोरे जावे लागणार असल्याने व्यापारी हवालदिल झाल्याचे चित्र आहे. असे असतानाही ठाकरे महाविकास आघाडी सरकार मात्र निद्रास्त अवस्थेत असल्याने सर्वसामान्यांचे हाल होताना दिसत आहे.

# रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात कोरोना प्रतिबंध लसीकरणास प्रतिसाद

। रायगड टाइम्स ।

रेवदंडा । रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात कोविड-१९ लसीकरणास प्रारंभ झाला असून परिसरातील ग्रामस्थांनी लसीकरणास मोठा प्रतिसाद दिला आहे. विशेषतः जेष्ठ नागरिकांनी मोठी गर्दी रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात कोविड-१९ लसीकरणास केली होती.

रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात कोविड-१९ लसीकरणाची सुविधा उपलब्ध करण्यात आली असून सुरूवातीस आठवड्यातील तीन दिवस ही सेवा दिली जात आहे. या कोविड-१९ लसीकरणासाठी परिसरातील नागारिकांनी मोठा प्रतिसाद दिली असून विशेषतः ज्येष्ठ नागरिकांची मोठी गर्दी पाहण्यास मिळाली. राजिप विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे यांनी बुधवार, दि. ७ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली व तेथील कोविड-१९ लसीकरणासाठी उपलब्ध सुविधेची पाहणी केली.



यावेळी रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टर सोनिया जाधव यांनी लसीकरणास मिळत असलेल्या प्रतिसादाचे समाधान व्यक्त करून लसीकरणासाठी आलेल्यांना विशेष सहकार्य येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातून दिले जात असल्याचा खुलासा केला. यावेळी राजिप विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात गर्दी पाहून बसण्यासाठी खुर्च्या व पटागंणात मंडप व्यवस्था तातडीने करण्यास सांगितले.

मात्र गुरूवार (दि.८) पासून जिल्हास्तरावर लसीचा साठा संपत आल्याने कोविड लसीकरण सत्र पुढील लस साठा उपलब्ध होईपर्यंत बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली असून लवकरात लवकर कोविड-१९ लस उपलब्ध करावी अशी मागणी करत आहेत.

## शेतजमीन पाहीजे

मांडवा ते चोंडीगाव दरम्यान ता. अलिबाग, जि. रायगड येथे १५-२० गुंटा शेतजमीन रोड टच विकत घेणे आहे.

अधिक माहीतीसाठी संपर्क

श्री. विकास राजपुत
मो. नं. ७७३८१२३६२८
९५-९६ 'सी' विंग, मित्तल कोर्ट,
जमनालाल बजाज मार्ग, नरीमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१

# पोलादपूरमधील शेकाप कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

## देवळे जिल्हा परिषद मतदार संघात सेनेला धक्का

। रायगड टाइम्स ।

पोलादपूर । पोलादपूर तालुक्यातील कालवली विठ्ठलवाडी येथील शेकापच्या असंख्य कार्यकर्त्यांनी आ.गोगावले यांच्या नेतृत्वावर लॉकडाऊनमध्येही विश्वास व्यक्त करीत आ. भरत गोगावले यांच्या महाड येथील कांगोरी गड या पक्ष कार्यालयात जाहिर प्रवेश केला. रायगड जिल्हा परिषदेचा देवळे मतदार संघ पुन्हा शिवसेनेच्या ताब्यात आणण्यासाठी या पक्षप्रवेशाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले असून सध्या या मतदार संघातून शेकापक्षाच्या सदस्या जिल्हा परिषदेवर निवडून गेल्या आहेत.



याप्रसंगी शेकापक्षामधून संतोष पांडूरंग पवार, गणपत गोविंद पार्टे, यशवंत सिताराम चव्हाण, वासुदेव महादेव पार्टे, सुरेश गोविंद पार्टे, गंगाराम गोविंद पार्टे, रावजी तुकाराम पार्टे, मारुती सहदेव पार्टे, प्रकाश सहदेव पार्टे, बाबू महादेव पार्टे, पांडुरंग आप्पा पवार, पांडुरंग सदू पार्टे, गणपत पार्टे यांच्यासमवेत शेतकरी कामगार पक्षाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

आ. गोगावले यांनी आगामी काळात शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या देवळे जिल्हा परिषद मतदार संघातून पुन्हा शिवसेनेचे वर्चस्व दिसून येईल आणि शिवसेनेमध्ये प्रवेश करणाऱ्यांच्या विकासकामांबद्दलच्या सर्व अपेक्षा पूर्ण होतील, अशी ग्वाही यावेळी दिली.

यावेळी प्रवेशकर्त्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अनेक वर्ष शेकापक्षात राहून कोणत्याही प्रकारची विकासकामे न झाल्याने शेकापक्षाच्या नेत्यांनी कायम खोटी आश्वासने देत आमची दिशाभूल केल्यामुळे आ.भरत गोगावले यांच्यामार्फत होणाऱ्या विकास कामांच्या कार्यपध्दतीवर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश करीत असल्याचे सांगितले. यावेळी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी प्रवेशकर्त्यांचे भगवी पताका घालून पक्षात स्वागत केले.

कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर अतिशय साधेपणाने झालेल्या पक्षप्रवेशावेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभाग प्रमुख सयाजी मांढरे, उपतालुकाप्रमुख शौकत तारलेकर, उमेश कालेकर, भिवा पवार, उपविभाग प्रमुख तसेच शाखाप्रमुख वासुदेव पवार, सरपंच शांताराम महाडिक आदी शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी, मान्यवर नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्टोअर कीपर

आम्ही ॲग्रो फर्टिलायझर्स आणि स्पेशालिटी केमिकल्सचे उत्पादक आहोत.

आमच्यायेथे तळोजा आणि लोहोप, रायगड, महाराष्ट्र येथे असलेल्या प्लांटमध्ये डेटा इन्ट्रीच्या माहितीसह स्टोअर कीपरची आवश्यकता आहे.

**पात्रता :** बी.कॉम

**अनुभव :** ३ ते ४ वर्षे स्टोअर कीपर म्हणून कामाचा अनूभव असणे आवश्यक (रासायनिक उत्पादन उद्योगातील अनुभव आवश्यक)

- स्टोअर कीपरच्या कर्तव्यांविषयी आणि जबाबदाऱ्यांबद्दल संपूर्ण ज्ञान असले पाहिजे.
- डेटा एन्ट्रीचे ज्ञान असावे.
- एसएपी (SAP) मध्ये कार्यरत ज्ञान असणे आवश्यक आहे.
- बॅचलर निवास उपलब्ध.

**स्थान :** तळोजा आणि लोहोप, रायगड, महाराष्ट्र.

**पगार :** सीटीसी २.५० ते २.७५ लाख

**संपर्क : ७६६६७१८९९४ / ई-मेल : info@uscpl.net**